# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती
# राष्ट्रीय सेवा योजना
# नियमित ahwal
# सत्र (२०२१-२२)

## राष्ट्रीय सेवा योजना सल्लागार समिती स्थापना – गठन (दि.२७.६.२०१८)

भारत सरकार युवा कार्य व खेळ मंत्रालय दिल्ली रा.से.यो.संहिता २००६ भाग -४ प्रकरण -५ मुद्दा क्रमांक ४,४,१,४,२,४,३ अन्वये रा.से.यो. विध्यापीठ कक्षाद्वारे निश्चित झालेले धोरणात्मक निर्णय कृती कार्यक्रम आराखडा आखणे तसेच नियोजन संबंधित सत्र २०१८-१९ करिता राष्ट्रीय सेवा योजना सल्लागार समितीचे गठन दि.२७ जून २०१८ (बुधवार) रोजी महाविद्यालयात रा.से.यो. अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय डी. नानोटी यांच्या मार्गदर्शनात करण्यात आले. या बैठकीत खालील सल्लागार समिती सदस्य उपस्थित होते व खालील विषयावर चर्चा करण्यात आली.

## रा. से. यो. तर्फे योग दिन साजरा (दि.२१.६.२०१८)

दि. २१/०६/१८ स्थानिक श्री रा. ल. तो विज्ञान महाविद्यालय अकोला येथील रा.से.यो.पथकाद्वारे २१ जुन २०१८ रोजी “आंतरराष्ट्रीय योग दिन”साजरा करण्यात आला. ह्या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय नानोटीउपस्थित होते तर प्रमुख मार्गदर्षक शिक्षक म्हणून शारिरीक शिक्षण विभागप्रमुख डॉ. राजेश चंद्रवंशी यांनी योग व प्राणायाम चे महत्व सांगत असतांनाविद्यार्थ्यांना उद्बोधित केले. विविध योगासनाचे प्रात्यक्षिक दाखवितांना त्याचे महत्व विद्यार्थ्यांना विषद केले. धकाधकीच्या जीवनात योगाचे शारिरीक व मानसिक संतुलन कायम राखण्या करिता विद्यार्थ्यांनी योग व प्राणायाम नियमित करावे असे आव्हान केले.

## १३ कोटी वृक्ष लागवड उपक्रमामध्ये रा.से.यो. चा सहभाग (दि.१.७.२०१८)

महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार संपुर्ण राज्यात १३ कोटीवृक्ष लागवड जुलै महिन्यामध्ये करण्यात आले. १३ कोटीवृक्ष लागवड या कार्यक्रमा अंर्तगत दि. १ जुलै २०१८ (रविवार) रोजी मोर्णा नदी काठी माननीय पालकमंत्र्यांच्या हस्ते वृक्ष लागवड करण्यात आले. यावेळी अकोल्याचे जिल्हाधिकारी मा.श्री.आस्तिक कुमार पाण्डेय यांच्या मार्गदर्शनाखाली वनविभाग व सामाजिक वनीकरण विभाग अकोला ह्यांच्या वतीने मोर्णा नदीच्या काठी वृक्ष लागवडीचा उपक्रम राबविण्यात आला.

या उपक्रमाअंर्तगत “माझे एक झाड मोर्णा नदी काठी” या संकल्प पुर्तीसाठी श्री रा. ल. तो. विज्ञान महाविद्यालय अकोला येथील प्राचार्य डॉ.व्ही.डी.नानोटी,रा.से.यो.चे क्षेत्रीय समन्वयक प्रा.डॉ.सुधीर कोह्चाळे, कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.समाधान मुंडे, प्रा.डॉ.रश्मी जोशी (सावलकर), रा.से.यो.चे स्वयंसेवक आणि महाविद्यालयीन शिक्षकवृंद या वृक्ष लागवड महोत्सवात मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.रा.से.यो.चेकार्यक्रम अधिकारी व रा.से.यो.चे स्वयंसेवकाद्वारे २० वृक्षाची लागवड राज्याचे पालकमंत्री मा. डॉ. रंजित पाटील यांच्या सोबत करण्यात आली. यामध्ये निम, पिंपळ,जांभूळ, बोर, पेरू, आणि वड इत्यांदी रोपट्याची लागवड करण्यात आली.रा.से.यो.चे कार्यक्रम अधिकारी व रा.से.यो.चे स्वयंसेवकाद्वारे २० वृक्षाची लागवड राज्याचे गृहराज्यमंत्री तथा पालकमंत्री अकोला मा.श्री डॉ.रणजीत पाटील यांच्या सोबत करण्यात आली. यामध्ये नीम, पिंपळ, जांभूळ, बोर, पेरू आणि वड अश्या विविध रोपट्यांची लागवड करण्यात आली. वृक्ष लागवडीच्या कार्यक्रमाचे

आयोजनविद्यार्थ्यांनी आणि अकोल्याच्या नागरिकांनी स्वच्छ केलेल्या मोर्णा नदीच्या काठी करण्यात आले. ह्या कार्यक्रमाचे उद्घाटनगृहराज्यमंत्री तथा पालकमंत्री अकोला माननीय श्री डॉ. रणजीत पाटील यांच्या हस्ते हिरवीफीत कापून करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष अकोल्याचे खासदार मा.श्री संजयजी धोत्रेहोते तसेच पोलीस अधीक्षक अकोला मा.श्री राकेश कलासागर यांची विशेष उपस्थिती होती. माननीय डॉ. रणजीत पाटील यांनी विद्यार्थ्यांना वृक्ष लागवडीचे महत्व तसेच त्यांचे संगोपन करण्याचे आव्हान आपल्या भाषणामध्ये केले.

## श्री रा.ल.तो विद्ग्यान महाविद्यालयात एक दिवसीय महिला सक्षमिकरण"सायबर क्राईम एंड वूमन सेफ्टी" कार्यशाळा (20/07/18)

रासेयो महिला कार्यक्रम अधिकारी डॉ.रश्मी जोशी ह्यांनी अकोला जिल्हा पोलीस दला- दामिनी २ पथकाच्या संयुक्त विद्यमाने दि २० जुलै २०१८ रोजी "**सायबर क्राईम एंड वूमन सेफ्टी**" ह्या कार्यशाळेचे आयोजन केले. कार्यशाळेचे उद्धाटक हे श्री विजय्कांत्जी सागर, अपर पोलीस अधीक्षक होते आणि कार्यशाळेचे अध्यक्ष डॉ.आर. बी. हेडा, अध्यक्ष बी.जी. ई. सोसायटी,अकोला हे होते. तसेच प्रमुख उपस्थिती मानानिया अद्व्होकेत श्री मोतीसिन्ह्जी मोहता, मानद सचिव,बी.जी.ई. सोसायटी अकोला, व रासेयो चे जिल्हा समन्वयक, श्री संजयजी तिडके ह्याची उपस्थिती लाभली.S.W.A.S. team(soldierforWomenandsafety) चे सक्रीय सदस्य पोलीस कॉन्स्टेबल श्री विशाल मोरे व श्री गोपाल मुकुंदे व महिला पोळीचे सब इन्स्पेक्टर कु. छाया वाघ ह्यांनी विद्यार्थ्यांना महिलांवर होणारे अत्याचार, गुड टच- बेड टच , इंटरनेट आणि महिला अश्या विविध विषयांपासूनबचाव करण्याचे मार्गदर्शन केले. व सर्व महिलांनी सबळ व जागरूक राहण्याचे आव्हान केले. कार्यशाळेला २६५ विद्यार्थी उपस्थित होते, त्यापैकी १६० मुली व १०५ मुलांना ह्याचा फायदा झाला. कार्यशाळेच्या संयोजिका डॉ. रश्मी जोशी , क्षेत्रीय सम. डॉ.सुधीर कोह्चाले, डॉ. अर्चना सावरकर रासेयो सल्लागार समिती सदस्य, कार्य.अधी. डॉ. समाधान मुंडे ह्यांनी काम पहिले. कार्यक्रमाच्या यशस्विते करिता रासेयोच्या विद्यार्थ्यांनी परिश्रम केले.

## रा. से. यो. तर्फे वृक्ष रक्षाबंधन सोहळा साजरा (दि.२७.८.२०१८)

महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनाच्या स्वयसेवकांनी वृक्ष रक्षाबंधन म्हणजे राखी बांधण्याचा कार्यक्रम दि.२७.८.२०१८ महाविद्यालयाच्या परिसरात आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाकरिता राष्ट्रीय सेवा योजनाच्या स्वयसेवकांनी मोठ्या आकाराच्या सुंदर राख्या तयार करून महाविद्यालय परिसरातील सर्व झाडांना राख्या बांधल्या.

कार्यक्रमाचे वैशिष्ठ म्हणजे वृक्ष रक्षाबंधन म्हणजे रा. से. यो. च्या स्वयसेवकांनी वृक्ष राखी बंधनाच्या माध्यमातून वृक्षसंवर्धन व पर्यावरण संवर्धन विषयक संदेश दिला. या वृक्ष रक्षाबंधनाच्या कार्यक्रमास प्रामुख्याने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. डी. नानोटी, क्षेत्रीय समन्वयक प्रा. डॉ. सुधीर कोह्चाळे, प्रा.डॉ.अर्चना सावरकर, कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.समाधान मुंडे, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. रश्मी जोशी (सावलकर), सहकार्यक्रम अधिकारी, प्रा. शैलेश जयस्वाल , प्रा. सोनाली गव्हादे, प्रा.शैलेंद्र मडावी, विध्यार्थी प्रतिनिधी श्री गोविंद आंधळे व कु. यशश्री डाबेराव आणि सर्व रा.से.यो. चे स्वयसेवक उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. व्ही. डी. नानोटी सरांनी आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये आपल्या जीवनात वृक्ष्याचे महत्त्व "वृक्ष वल्ली आम्हा सोयरी वनचरे , पक्षी हि सुस्वरे आळविती" या अभंगाद्वारे महत्त्व सांगितले व झाडे लावा झाडे जगवा असा संदेश सर्व रा.से.यो. च्या विध्यार्थ्यांना दिला. या कार्यक्रमाप्रसंगी रा.से.यो. चे क्षेत्रीय समन्वयक प्रा. डॉ. सुधीर कोह्चाळे यांनी पर्यावरण संवर्धन काळाची गरज आहे या विषयावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन गोविंद आंधळे यांनी केले तर आभार प्रदर्शन यशश्री डाबेराव हिने केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ईश्वर निर्मळ , अक्षय घोपे, अक्षय दांडळे, निकिता ठाकरे, रोहिणी शेळवणे, नम्रता गायकवाड व

इतर रा. से. यो. च्या स्वयसेवकांनी परिश्रम घेतले आणि शेवटी कार्यक्रमाची सांगता "खरा तो एकाची धर्म , जगाला प्रेम अर्पावे " या पार्थनेने झाली.

## अ ) स्वच्छ भारत अभियान पंधरवडा शपथ (दि.१.८.२०१८)

विभागीय संचालक, युवा कल्याण व क्रीडा विभाग , भारत सरकार नवी दिल्ली यांच्या पत्रानुसार महाविद्यालयातील रा.से.यो. च्या स्वयसेवकांनी "स्वच्छ भारत अभियान पंधरवाडा"शपथ दि.१.८.२०१८ (बुधवार) रोजी महाविद्यालयात घेण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. डी. नानोटी होते तर प्रमुख अतिथी रा. से. यो. चे क्षेत्रीय समन्वयक प्रा. डॉ. सुधीर कोह्चाळे होते.

प्राचार्य डॉ. व्ही. डी. नानोटी सरांनी आपल्या अध्यक्षीय भाषणाची सुरुवात "स्वच्छ भारत स्वस्थ भारत" शपथीने केली आणि सोबतच रा.से.यो. च्या सर्व स्वयसेवकांनी सुद्धा स्वच्छता शपथ घेतली आणि प्राचार्यांनी विद्यार्थ्यांना "स्वच्छ भारत स्वस्थ भारत" या विषयावर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाप्रसंगी लाभलेले प्रमुख अतिथी रा.से.यो. चे क्षेत्रीय समन्वयक प्रा. डॉ. सुधीर कोह्चाळे यांनी "स्वच्छता पाळा रोगराई टाळा " या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन यशश्री डाबेराव हिने केले तर आभार प्रदर्शन निकिता ठाकरे हिने केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. रश्मी जोशी (सावलकर) यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.समाधान मुंडे व इतर रा. से. यो. च्या स्वयसेवकांनी परिश्रम घेतले आणि शेवटी कार्यक्रमाची सांगता कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.समाधान मुंडे यांनी "स्वच्छ भारत का इरादा , इरादा कर लिया हमने; देश से अपने वादा, वादा कर लिया हमने " या गीताने केली.

## ब) महाविद्यालयीन परिसर स्वच्छता (दि.२.८.२०१८.ते ५.८.२०१८)

स्वच्छ भारत अभियान पंधरवाडा या मोहिमे अंर्तगत महाविद्यालयीन रा.से.यो.च्या विध्यार्थ्यानीदि.२.८.२०१८ ते ५.८.२०१८ या चार दिवसात महाविद्यालयीन परिसर स्वच्छता, वर्ग खोल्या , प्रयोगशाळा , ग्रंथालय , बाथरूम , महाविद्यालयातील सभागृह, महाविद्यालयाच्या समोरील रस्ता व इतर परिसर ची स्वच्छता करण्यात आली . या स्वच्छता मोहीमेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. डी. नानोटी यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.समाधान मुंडे व महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. रश्मी जोशी (सावलकर) यांनी रा. से. यो. च्या विद्यार्थासोबत स्वच्छता मोहीम चार दिवस राबविण्यात आली.

## क) स्वच्छते कडून समृद्धीकडे ग्राम सोनाळा लोकांना संदेश (दि.६.८.२०१८ ते १०.८.२०१८)

स्वच्छ भारत अभियान पंधरवाडा या मोहिमे अंर्तगत महाविद्यालयीन रा.से.यो.च्या विध्यार्थ्यानी ग्राम सोनाळा येथे दि.६.८.२०१८ ते १०.८.२०१८ या पाच दिवसामध्ये गावातील लोकांना स्वचतेबद्दल सांगण्यात आले. स्वच्छता आजच्या काळाची गरज आहे, स्वच्छता पाळा रोगराई टाळा अश्या विषयावर लोकांना सांगण्यात आले आणि स्वच्छता हि आपल्या स्वताच्या शरीरापासून सुरु करायची नंतर आपले घर , संडास , बाथरूम , घरासमोरील परिसर , गावातील रस्ता स्वच्छ ठेवायला पाहिजे असे रा.से.यो.च्या विध्यार्थ्यातर्फे गावातील लोकांना सांगण्यात आले तर काही रा.से.यो.च्या विध्यार्थ्यानी प्राथमिक शाळेमध्ये जाऊन लहान मुलांना स्वच्छते बद्दल मार्गदर्शन केले व जी मुले स्वच्छ आहेत त्यांना रा.से.यो.च्या विध्यार्थ्यानी चॉकलेट्स चे वाटप करून त्यांना आनंदित केले. लहान मुलांना आपले घर , आंगण , घरामोरील रस्ता, गावातील रस्ते स्वच्छ असतील तर आपण स्वस्थ आणि निरोगी राहू असे सांगण्यात आले आणि हाथपाय स्वच्छ ठेवणे, नखे कापणे इत्यांदी गोष्टी सांगण्यात आल्या.या स्वच्छते मोहिमे अंर्तगत महाविद्यालयीन रा.से.यो.च्या विध्यार्थ्यानी ग्राम सोनाळा लोकांना एक प्रकारचा स्वच्छते कडून समृद्धीकडे जाण्याचा संदेश दिला.

## ड) महापुरुष्याच्या पुतळ्याची स्वच्छता (दि.१४.८.२०१८)

महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनाच्या स्वयसेवकांनी दि. १४.८.२०१८ (मंगळवार) रोजी अकोला बसस्थानकासमोरीलमदनलाल धीग्रा चौकालगत असलेला ब्रिजलाल बियाणी यांच्या पुतळयाच्या आजूबाजूच्या परिसराची स्वच्छता करून तेथील आजूबाजूच्या लोकांना त्या परिसरात स्वच्छता पाळा रोगराई टाळा असा संदेश रा. से.यो. च्या स्वयसेवकांतर्फे देण्यात आला. त्याचप्रमाणे नजीकच्या गांधी जवाहर उद्यानामधील राष्ट्रपिता महात्मा गांधी व पंडित जहाहार्लाल नेहरू या महापुरुष्याच्या पुतळयावर पाणी मारून स्वच्छता करण्यात आली तसेच उद्यानाच्या सर्व परिसराची स्वच्छता करण्यात आली. उद्यानाची स्वच्छता झाल्यानंतर प्रा. डॉ. सुधीर कोह्चाळे यांनी रा. से.यो. च्या स्वयसेवकांना “माझ्या घराची स्वच्छता म्हणजे माझ्या अंगणाची स्वच्छता ; माझ्या अंगणाची स्वच्छता म्हणजे माझ्या गावाची स्वच्छता ; माझ्या गावाची स्वच्छता म्हणजे माझ्या शहराची स्वच्छता; माझ्या शहराची स्वच्छता म्हणजे माझ्या भारत देशाची स्वच्छता ” अश्या प्रकारचे मार्गदर्शन सुद्धा यावेळी करण्यात आले.

## ई) स्वतंत्र दिन सोहळा व वृक्षारोपण कार्यक्रम (दि.१५.८.२०१८)

श्री रा.ल.तो. विज्ञान महाविध्यालयात दि.१५.८.२०१८ (बुधवार) रोजी स्वतंत्र दिना निमित्तप्राचार्य डॉ. व्ही. डी. नानोटीयांच्या हस्ते ध्वजारोहन करण्यात आले. या प्रसंगी रा. से. यो. चे क्षेत्रीय समन्वयक प्रा. डॉ. सुधीर कोह्चाळे, कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.समाधान मुंडे व महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. रश्मी जोशी (सावलकर), सहकार्यक्रम अधिकारी प्रा. सोनाली गव्हादे, व प्रा. शैलेश जयस्वाल, विध्यार्थी प्रतिनिधी श्री गोविंद आंधळे व कु. यशश्री डाबेराव आणि सर्व रा.से.यो. चे स्वयसेवक उपस्थित होते. या प्रसंगी प्राचार्य डॉ. व्ही. डी. नानोटी सरांनी आपल्या भाषणामध्ये “स्वच्छ भारत , स्वस्थ भारत” या वाक्याचा उल्लेख करून रा.से.यो.च्या स्वयसेवकांनी गेल्या १५ दिवसापासून स्वच्छ भारत अभियान पंधरवाडा राबवीत आहेत आणि आज पंधरवाडा संपन्न होत असून रा.से.यो. च्या सर्व विद्यार्थ्यांना पुढील उपक्रमाकरिता शुभेच्या दिल्या. त्यानंतर महाविद्यालयीन परिसरात वृक्षा रोपणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. रा.से.यो.पथकातर्फे महाविद्यालयीन परिसरात मा. प्राचार्य व इतर मान्यवराच्या हस्ते रोपट्याचे विध्यार्थ्यांना वितरण करून पर्यावरण संवर्धनाचा संकल्प करण्यात आला. यानंतर महाविद्यालयीन सभागृहामध्ये देशभक्तीपर सास्कृतिक कार्यक्रम साजरा करण्यात आला.देशभक्तीपर सास्कृतिक कार्यक्रमाचे सुत्रसंचालन अक्षय घोपे यांनी केले तर आभार प्रदर्शन रोहिणी शेळवने हिने केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.समाधान मुंडे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. रश्मी जोशी (सावलकर), सहकार्यक्रम अधिकारी प्रा. सोनाली गव्हादे, व प्रा. शैलेश जयस्वाल आणि रा. से. यो. च्या सर्व स्वयसेवकांनी परिश्रम घेतले आणि शेवटी कार्यक्रमाची सांगता रा. से. यो. च्या विध्यार्थ्यांनी “ सुनो गौर से दुनियावालो, बुरी नजर ना हम पे डालो ” या गीताने केली.

## शिक्षक दिन साजरा (दि.५.९.२०१८)

दरवर्षी परंपरेने ह्या वर्षी देखील शैक्षणिक सत्राच्या सुरुवातीला भारताचे महान सुपुत्र डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिनाच्या निमीत्याने आयोजित कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. डी. नानोटी अध्यक्ष स्थानी होते. याप्रसंगी मंचावर रा.से.यो.चे क्षेत्रीय समन्वयक प्रा.डॉ.सुधीर कोह्चाळे, प्रा.डॉ. भालेकर (सुश्मजीवशास्त्र विभागप्रमुख) प्रा. राम चव्हाण (परमाणुशास्त्र विभागप्रमुख), प्रा.डॉ. राजेश चंद्रवंशी (शारीरिक शिक्षण विभागप्रमुख), कार्यक्रम अधिकारीप्रा.डॉ.समाधान मुंडे, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. रश्मी जोशी (सावलकर)समवेत महाविद्यालयाचे सर्वच प्राध्यापकवृंद उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दिप प्रज्वलानाने आणि डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन ह्यांच्या फोटोला हार अर्पण करून झाली. या प्रसंगी अनेक विध्यार्थ्यांनी त्यांच्या

शिक्षकांप्रती असलेल्या आदराच्या भावना व्यक्त केल्या. त्यामध्ये प्रामुख्यानेगोविंद आंधळे, अक्षय घोपे , रोहिणी शेळवने या इतर विध्यार्थ्यांची  भाषणे झालीत. सर्व प्राध्यापकाचा सत्कार करण्यात आला.

शेवटी अध्यक्षीय भाषणामध्येप्राचार्य डॉ. व्ही. डी. नानोटी सरांनी रा.से.यो. च्या सर्व विध्यार्थ्यांचे कौतुक करून प्राध्यापकांना आपले सेवेत व्रत असेच ठेवण्याबाबत आवाहन केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन ईश्वर निर्मळ यांनी केले तर आभार प्रदर्शनयशश्री डाबेराव हिने केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रा. से. यो. च्या स्वयसेवकांनी परिश्रम घेतले आणि शेवटी कार्यक्रमाची सांगता पसायदानाने झाली.

**गांधी जयंती व लाल बहादूर शास्त्री जयंतीनिमित्त २ ऑक्टोबर २०१८ ला रासेचे स्वछता अभीयान:**

**राष्ट्रपिता गांधी ह्यांच्या १५० व्या जयंती निमित्य महाविद्यालयाच्या रासेयो तर्फे साप्ताहिक विविध कार्यक्रम  राबविण्यात आले:**

दि.२४ सप्टेम्बर ते ०२ ऑक्टोबर २०१८ ह्या कालावधित महाराष्ट्र शासन उच्च तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या परिपत्रकानुसार श्री रालतो विज्ञान महाविद्यालाच्या रासेयो पथकाद्वारे विविध कार्यक्रम राबविण्यात आले. दि. २४ सप्टेम्बर रोजी “स्वच्छता हि सेवा” ह्या कथानकाच्या आधारावर महाविद्यालाचे परिसर स्वच्छ करण्यात आले. पूर्ण प्रांगण, खोल्या, बगीचा , रस्ते व सर्व परिसर स्वच्छतेचे धडे देत देत आव्हाहन केले गेले.

दि. २५ सप्टेम्बर रोजी दत्तक ग्राम सोनाला येथे जनजागृती करण्यात आली. गावात रासेयोच्या चमू नी घरोघरी, दारोदारी जाऊन गावकर्यांमध्ये स्वच्छतेचे व आरोग्याच्या रक्षणाचे  बी रुजविण्याचे प्रयत्न केले गेले.

विद्यार्थ्यांच्या विविध प्रतियोगिता घेण्यात आल्या. निबंध स्पर्धा, विषय होते “प्लास्टिक फ्री इंडिया” आणि “ गांधीजींच्या जीवनावर व त्यांचे कार्य ” ह्या विषयावर वक्तृत्व स्पर्धा घेण्यत आल्या. ह्या स्पर्धेच्या माध्यमातून जनजागृती करण्याचे काम केल्या गेले. रासेयोच्या विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रातिसाद लाभला. कार्यक्रम अधिकारी डॉ. रश्मी जोशी व डॉ.समाधान मुंडे ह्यांनी रासेयो चे क्षेत्रीय समन्वयक डॉ. कोह्चाले व माननीय प्राचार्य डॉ. वी डी नानोटी ह्यांच्या मार्गदर्शनाखाली हे साप्ताह चांगल्या विविध रित्या राबविण्यात आले.

दि. ०२ ऑक्टोबर २०१८ रोजी श्री रालतो महाविद्यालयाच्या सभागृहात रासेयोच्या १०० स्ववाम्सेवक आणि शिक्षक व शिक्षकेतर कर्मचार्याच्या उपस्थितीत १५० सावी गांधी जयंती कार्यक्रम घेण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नानोटी होते . रासेयोचे क्षेत्रीय समन्वयक डॉ. कोह्चाले व डॉ. चव्हाण, इलेक्ट्रोनिक्स विभाग प्रमुख, ह्यांची प्रमुखउपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे संचालन रासेयो कार्य.अधि. डॉ. रश्मी जोशी ह्यांनी केले व आभार प्रदर्शन डॉ. समाधान मुंडे ह्यांनी केले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली व व्यसन मुक्ती करिता विद्यार्थ्यांना शपथ देण्यात आली. त्यानंतर स्वच्छता रेली काढण्यात आली, त्यामध्ये रासेयोची चमू व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा सहभाग  लाभला. सोबत दिलेल्या वेब लिंक वर रेली बद्दल माहिती आहे.

https://youtu.be/Zh0EudZHTnY

*आर.एल.टी. च्या विद्यार्थ्यांचे स्वच्छता जनजागृतीअभियान...*अकोल्यातील आर.एल.टी. विज्ञान महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी गांधी जयंती निमित्त स्वच्छते बाबत व्यापक जनजागृती साठी रॅली काढून व चौकात पथ नाट्यचे प्रयोग करून एक आगळा वेगळा प्रयोग केला आहे.

## संविधान साप्ताह साजरा (२४ नोव्हेंबर ते २ डिसेंबर २०१८)

२६ नोव्हेंबर ला रासेयो पथकाद्वारे संविधान दिवस साजरा केला गेला , संविधान प्रीआम्बलचे वाचन करण्यात आले. संविधान चा मान राखण्या बद्दल शपथ देण्यात आली. वक्तृत्व स्पर्धा व निबंध स्पर्धा घेण्यात आल्या. विद्यार्थिनीनी सुद्धा आपल्या वक्तृत्वात भारतीय घटनेबाबत सखोल माहिती दिली.

## १ डिसेम्बर २०१८ जागतिक एड्स दिवस- रेड रिबन क्लब ची स्थापना

१ डिसेम्बर २०१८ जागतिक एड्स दिवसचे औचित्य साधून "रेड रिबन क्लब" ची स्थापना व गठन करण्यात आले. कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती डॉ पेठेमाडम व डॉ झोडपेमाडम, श्री शिवाजी महाविद्यालय, अकोला ह्यांची होतीव सूक्ष्मजीवशास्त्र विभाग प्रमुख ह्यांनी एड्स बद्दल खूप सुंदर असे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. वी.डी.नानोटी हे होते. त्यांनी विद्यार्थ्यांना समाजात एड्स बद्दल जनजागृती करावयास उद्बोधित केले.

## श्री संत गाडगबाबा विद्यापीठ अमरावती विद्यापीठ येथे D.M.C. ची कार्यशाळा (दि.१४ .१२.२०१८)

श्री संत गाडगबाबा विद्यापीठ अम्रावतीमध्ये DMC ची एक दिवसीय कार्यशाळा घेण्यात आली. रासेयो चे क्षेत्रीय समन्वयक डॉ.सुधीर कोव्हाले ह्यांनी रेसौर्स पर्सन म्हणून कार्य केले. ८ ते १० वेगवेगळ्या ठिकाणी DMC च्या कार्यशाळा घेण्यात आल्या. श्री रालतो विज्ञान महाविद्यालयातील हे पथकआहे विद्यापीठातील हे सर्वात पहिले गठीत केलेले एकमात्र पथक आहे .

## १६ ते २३ दिसेम्बर- रासेयो चे विशेष शिबीर , ग्राम आपोती (खुर्द) येथे घेण्यात आले

श्री रा.ल.तो विज्ञान महाविद्यालयातील रासेयो पथकाचे विशेष शिबीर १६ ते २३ डिसेंबर २०१८ , ग्राम आपोती (खुर्द) येथे घेण्यात आले. शिबिरात १०० स्वयंसेवक होते त्यापैकी ५७ मुली व ४३ मुलांनी सहभाग घेतला. गावकर्यांमध्ये स्वच्छते विषयी आणि पाणी संवर्धन करण्या बाबत जनजागृती करण्यात आली. महिला मेळाव्यात कार्यक्रम अधिकारी डॉ.रश्मी जोशी सावलकर ह्यांनी गावातील मुलींना व महिलांना अगरबत्ती बनविण्याचे व कागदापासून पिशव्या बनविण्याची कार्यशाळा घेतली जेणेकरून घरगुती उद्योग महिलांना मिळावे. रासेयो पथकाने वनराई बंधारा बांधून व गांव स्वच्छता करीत गाव फेरी काढून श्रमदान केले.

## रक्तदान शिबीर (दि. २४.१२.२०१८)

दिनांक २४/१२/१९ ला रासेयो पथकाद्वारे श्री रा.ल.तो विज्ञान महाविद्यालयात माननीय प्राचार्य श्री म.गो. जोशी ह्यांच्या स्मृती प्रीत्यर्थ रक्तदान शिबिराचे आयोजन दरवर्षी करण्यात येते. ३७ रक्तदात्यांनी ह्या शिबिरात रक्तदान केले.

## मोर्णा महोत्सव मध्ये रासेयो स्वयम्सेवकांनी सहभाग (दि.२९.१२.२०१८)

जिल्हाधिकारी कार्यालय अकोलाच्या वतीने २९/१२/१८ ल मोर्णा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते . रासेयोच्या विद्यार्थीनीच्या व शिक्षकानी, कार्यक्रम अधिकारी डॉ. रश्मी जोशी ह्यांच्या मार्गदर्शना खाली मोर्णा महोत्सवात गीत गायन व नृत्य द्वारा आपला सहभाग नोंदविला.

## रस्ता सुरक्षा अभियाना दरम्यान रासेयो च्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन (दि. ८.१.२०१९)

दि. ८/१/१९ रोजी महाविद्यालात अकोला शहर वाहतूक शाखेचे प्रमुख श्री विलास पाटील ह्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अकोला जिल्हा पोलीस अधीक्षक श्री एम. कलासागर ह्यांच्या संकल्पनेतून हा अभियान

राबविण्यात आला. रस्त्यावर सुरक्षा कशी ठेवावी , अपघात झाल्यास काय करावे या बद्दल चे धडे दिले. कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य , रासेयो क्षेत्रीय समन्वयक डॉ.सुधीर कोह्चाले ह्यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या याश्वितेसाठी कार्यक्रम अधिकारी डॉ.समाधान मुंडे ह्यांनी प्रयत्न केले.

## युवा दिन साजरा (दि. १२.१.२०१९ )

### १८ ते २५ जानेवारी २०१९ जिल्हा विशेष शिबिरात ३ रासेयोच्या तीन विद्यार्थिनींचा सहभाग

श्री. रालतो महाविद्यालयाच्या तीन विद्यार्थिनी कु. प्रगती नवलकर, कु. मानिशाकुमारी गुडधे आणि कु.स्नेहल गावंडे ह्या १८ ते २५ जनवरी २०१९ या दरम्यान आयोजित विद्यापीठ स्तरीय जिल्हानिहाय शिबिरात गरम सोनाला येथे सहभागी झाल्या.

## रासेयो तर्फे महाविद्यालयात अकोला पक्षी निवडणूकिला उत्स्फूर्त प्रातिसाद (दि. १९.१.२०१९ )

अकोला निवडणूक कार्यालय व निसर्गकट्टा ह्यांच्या संयुक्त विद्यमाने अकोल्याचा पक्षी निवडण्यासाठी एक आगळीवेगळी “पक्षी निवडणूक” शहराच्या प्रत्येक शाळेत व महवीद्यालात घेण्यात आली. रालतो महविद्यालयात विक्रमी मतदान झाले. रिंगणात पांच पक्षी उम्मेद्वार होते, प्रत्येक उम्मेद्वाराचे प्रचार करण्याकरिता रासेयोच्या पांच विद्यार्थ्यांची नेमणूक केली गेली. गाय बगळा हा पक्षी निवडून आला. श्री रालतो महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु. आरती कडू हिला उत्कृष्ट प्रचार केल्याबद्दल अकोला जिल्हाधिकारी कार्यालयात गौरविण्यात आले.

## राष्ट्रीय मतदान दिनानिमित्य रासेयो पथकाचा जनजागृती रेली मध्ये सहभाग (दि. २५.१.२०१९ )

जिल्हाधिकारी अकोलाच्या वतीने राष्ट्रीय मतदान दिनानिमित्य दि.२५/०१/१९ ला रेल्ली कढण्यात आली. ह्या रेल्लीमध्ये रंतो महाविद्यालयाचे रासेयो चमू नी सहभाग नोंदविला व नारे लावत आणि पोस्टर्स च्या मध्यमांनी जनजागृती केली.

## संत गाडगेबाबांच्या दुर्मिळ छायाचित्रांची प्रदर्शनी (दि. ४.२.२०१९ )

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या अद्यासन केंद्राच्या वतीने श्री रालतो महाविद्यालयात गाडगे बाबांच्या दुर्मिळ छाया चीत्रांची प्रदर्शनी दि.४/२/१९ ला लावण्यात आली होती. ह्या प्रदर्शनी चे उद्घाटक म्हणून माननीय श्री. दिलीपजी काळे, रासेयो सल्लागार समिती सदस्य तसेच दिरेक्टर “गाडगे बाबा अध्यासन केंद्र ” अमरावती विद्यापीठ हे होते. महाविद्यालाचे प्राचार्य माननीय डॉ. नानोटी ह्यांच्या मार्गदर्शना खाली कार्यक्रम अधिकारी डॉ. रश्मी जोशी व डॉ. समाधान मुंडे ह्यांनी प्रदर्शनीचे आयोजन केले. प्रदर्शानीच्या याश्वितेकारिता रासेयोच्या विद्यार्थ्यांनी अथक परिश्रम घेतले.

## श्री रा ल तो. विज्ञान महाविद्यालयात “रस्ता सुरक्षा साप्ताह २०१९” निमीत्य रा.से.यो. पथकाद्वारे रांगोळी स्पर्धा व घोषवाक्य स्पर्धा (दि. १२.२.२०१९ )

रस्ता सुरक्षा साप्ताहनिमित्य पथनाट्याचे सादरीकरण ८ फ़ेब्रुवरि २०१९ दि. ८/२/२०१९ रोजी स्थानिक, श्री रा. ल. तो. विज्ञान महाविद्यालय अकोला चे रासेयो पथक व जिल्हा उप प्रादेशिक वाहन कार्यालय यांचे संयुक्त विद्यमाने रास्ता सुरक्षा अभियानाचे निमित्त जनजागृती अभियान राबविण्यात आले. या अभियाना अंतर्गत रासेयो स्वयाम्कांद्वारे पथनाट्याचे आयोजन व सादरीकरण शहरातील विविध ठिकाणी करण्यात आले. प्रामुख्याने रेल्वे स्थानक, बस स्थानक, सिटी कोतवाली, गांधी रोड तसेच महाविद्यालयात सादरीकरण करण्यात आले. रा. से. यो. च्या व आपत्ती व्यवस्थापन कक्षाच्या विद्यार्थ्यांनी पथनाट्याचे सादरीकरण केले. यात हेल्मेट चा वापर, सिग्नल चे काटेकोरपणे पालन करणे, मद्यपान करून गाडी न चालवणे, गाडीचे व्यवस्थित दस्तऐवज ठेवणे, फूटपाथचा

व्यवस्थित वापर अशा तत्सम विषयावर पथनाट्याच्या माध्यमातून सादरीकरण झाले. या वेळी श्री. वारोकर व श्री नीलेकर उप प्रादेशिक वाहन कार्यालय अकोला तसेच मा. डॉं. सुधीर कोहचाळे रासेयो, क्षेत्रीय समन्वयक यांनी प्रत्येक स्थळी जनजागृती पर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या यशश्वीतेसाठीरा.से.यो. कार्यक्रम अधिकारीडॉ. समाधान मुंडे व डॉ. रश्मी जोशी सावलकर यांनी अथक परिश्रम घेतले.

रस्ता सुरक्षा सप्ताहाच्या शेवटच्या दिवशी दि. १२/०२/२०१९ रोजी रांगोळी स्पर्धा आणि घोषवाक्य स्पर्धेचे आयोजन रासेयो च्या महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. रश्मी जोशी सावलकर ह्यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले व दोन्ही स्पर्धकांपैकी १ले, २ रे, व ३ रे पारितोषिक देण्यात आले.

## रासेयो व DMC च्या विद्यार्थ्याची सहल आयोजित (दि. २१.२. २०१९ )

दिनांक २१/०२/१९ ला रासेयो व DMC च्या विद्यार्थ्याची सहल पातुर तलाव, वन्य प्रण्याप्रन्यांचे इंटरप्रिटेशन केंद्राला नेण्यात आली. ह्या सहली दरम्यान वन्यजीव संरक्षण आणि विविधता बद्दल धडे देण्यात आले.

## मतदान जनजागृती करण्याकरिता महाविद्यालयात शपथ (दि. ३.३.२०१९ )

श्री संत् गाडगे बाबा विद्यापीठ रासेयो पथकाकडून मिळालेल्या पत्रानुसार ज्या विद्यार्थ्यांची मतदार यादीत नव्याने नोंद झाली आहे अश्या विद्यार्थ्यांना शपथ देण्यात आली, कि ते स्वतः मतदान करतील व इतर नागरिकांना सुद्धा मतदानाचा हक्काबद्दल माहिति देतील व मतदान करून आपले भारतीय नागरिक होण्याचे कर्तव्य पूर्ण करतील.माननीय प्राचार्य डॉ.वी. डी. नानोटी ह्यांनी विद्यार्थ्यांकडून हि शपथ घेतली.

## SGBAUविद्यापीठात दोन दिवसीय महिला सक्षमीकरण कार्यशाळेत दोन रासेयोच्या विद्यार्थिनींचा सहभाग (दि. २५.३२०१९ )

दि.२५ व २६ मार्च २०१९ ला अमरावतीविद्यापीठाच्या रासेयो कार्यालय द्वारे दोन दिवसीय महिला सक्षमीकरण कार्यशाळा घेण्यात आली . ह्या कार्याशाळेत श्री रालतो विज्ञान महाविद्यालयातील रासेयो च्या दोन विद्यार्थीनी,कु. शिवानी गंगमवार व कु. अंकिता गजभिये ह्यांनी आपला सहभाग नोंदविला. महिलांनी कशे सक्षम व्हावे व प्रत्येक कार्यात त्यांचा सहभाग व्हावा त्याकरिता कार्याशालेत त्यांना मनोबल वाढविण्याकरिता धडे देण्यात आले.

## सकाळ वृत्तसेवा च्या उपस्थितीतश्री रालतो विज्ञान महाविद्यालयाच्या रासेयो विद्यार्त्यांनी मतदान करण्याची घेतली शपथ (दि. ४.४.२०१९ )

दि. ४/४/१९ रोजी सकाळ वृत्तसेवा ह्यांच्या उपस्थितीत “I Will Vote” अशी एक शपथविधी चा कार्यक्रम घेण्यात आला. काही रासेयोच्या विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी सकाळ वृतापात्राच्या माध्यमानी लोकांपर्यंत मतदान करण्याचे आव्हान केले व आपले विचार मांडले.

## नियमित कार्यक्रमाचे छायाचित्रे

# सत्र २०१८ - १९




१३ कोटी वृक्ष लागवड उपक्रमामध्ये रा. से. यो. चा सहभाग (दि.१.७.२०१८)




वृक्ष लावतांना मान. रंजीत जी पाटील, पालक मंत्री अकोला, व श्री रालतो विज्ञान महाविद्यालयातील रासेयो चमू.




“सायबर क्राईम एंड वूमन सेफ्टी” कार्यशाळा (20/07/18) : संयोजिका कार्य.अधिकारी डॉ. जोशी व मान्यवर.



वृक्ष रक्षा बंधन : वृक्षांना राखी बांधून शपथ घेतली.




मुनिजन: च्या माध्यमातून श्री रालतो महाविद्यालयात स्वच्च्ता पंधरवडा राबविला गेला



वर्ग, खोल्या, कॅम्पस स्वच्च्त करतांना रासेयो चे विद्यार्थी

| | |
|---|---|
|  |  |
| रेड रीब्बन क्लब ची स्थापना व एड्स बद्दल जनजागृती, डॉ. पेठे व डॉ. झोडपे, सूक्ष्मजीवशास्त्र विभाग प्रमुख ह्यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. | अकोला बस स्थानकावर रासेयोची पूर्ण चमू. |
|  |  |
| स्वच्छ भारत स्वस्थ भारत अभियानातून स्वच्छता पथनाट्याचे सादरीकरण करतांना रासेयो ची चमू (दि.२/१०/१८) | स्वच्छता रेली, प्राचार्य डॉ. वी.डी. नानोटी व रासेयो ची चमू (दि.२/१०/१८) |
|  |  |
| रासेयो विशेष शिबीरात गावकर्यांना आणि महिला मेळाव्यात महिलांना स्वयं रोजगाराचे प्रशिक्षण दिल्या गेले | पेपरच्या पिशव्या व अगरबत्ती बनविण्याचे व मत्स्यव्यवसाय करिता एक्वेरिअय्म बांधणीच्या दोन वेगळ्या रासेयो विशेष शिबीरात कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या. |




दि.२४/१२/१८ ल महविद्यालयात रासेयो तर्फे रक्तदान शिबीर- ३७ विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी दान केले.




श्री रालतो विज्ञान महाविद्यालयात "युवा संसद" अकोला जिल्ह्याच्या विद्यार्थ्यांची निवड केली गेली, डॉ. सुधीर कोल्हाले ह्यांनी नोडल अधिकारी म्हणून काम पहिले.




विशेष शिबीर ग्राम आपोती येथे बळीराजा चेतना अभियान ह्या कार्यक्रमाला उपस्थित मान.डॉ. संजय तिडके, जिल्हा समन्वयक रासेयो अकोला.




अकोला शहर पक्षी निवडणूक, अकोला जिल्हा निवडणूक कार्यालय व निसर्ग कट्टा च्या संयुक्त विद्यमाने श्री रालतो विज्ञान महाव्द्यालायाच्या रासेयो पथकाने राबविली व ७७६ विद्यार्त्यांनी आपले मत दिले व कार्यक्रम यशस्वी करण्या करिता प्रयत्न केले.



अकोला रेल्वे स्टेशन येथे रस्ता सुरक्षा साप्ताह दरम्यान पथनाट्याचे सादरीकरण




रस्ता सुरक्षा साप्ताह दरम्यान घोष वाक्य स्पर्धा व रांगोळी स्पर्धा घेण्यात आल्या .

सकाळ » TODAY

20/1/2019

» स्कूल कनेक्ट




## श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालयात अकोला पक्षी निवडण्यासाठी मतदान

अकोला, ता.१९ : अकोला पक्षी निवडण्यासाठी १९ जानेवारी रोजी श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालयात मतदान घेण्यात आले. यावेळी ७७६ जणांनी मतदान केले. त्यातच ४७ शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांचाही समावेश आहे. सर्वाधिक ६०३ मुली व १२६ मुलांनी मतदान केले. महाविद्यालयातील मोनिका अग्रवाल, शिवानी गंगमवार, अश्विनी भोलवणकर, अविनाश अंजनकर व आरती कडू यांनी प्रचार प्रमुख तथा मतदान अधिकारी म्हणून कार्य केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता प्राणीशास्त्र विभाग प्रमुख डॉ.सुशिल नगराळे, डॉ.अर्चना सावरकर, डॉ.रश्मी जोशी, डॉ.रहाटगांवकर, डॉ.सुधिर कोहचाळे व रासेयोच्या स्वयंसेवकांनी परीश्रम घेतलेत.

20/1/2019

देशोन्नती

## विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष मतदानातून ठरणार अकोल्याचा पक्षी !

### निवडणूक मतदानाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद




**प्रतिनिधी/१९ जानेवारी**

**अकोला :** अकोला शहर पक्षी निवडणूक मतदानाला प्रारंभ झाला असून शहरातील विविध शाळा, महाविद्यालयात मतदान प्रक्रीया राबविण्यात येत असून विद्यार्थ्यांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत आहे. एकूण पाच पक्षी मधुन अकोला शहराचा पक्षी कोणता यावर २५ जानेवारीला निकाल जाहीर होणार आहे. शालेय विद्यार्थांना प्रत्येक्ष निवडणुकीत भाग घेता येत नाही यासाठी ठराविक वयोमर्यादाची अट आहे. मात्र पक्षी निवडणुकीतून त्यांना मतदानाचा अनुभव यावा या बाबतची माहिती व्हावी, याकरीता ही मतदानाची प्रक्रीया राबवली जात आहे.

या पक्षी निवडणुकीसाठी मतदान यंत्रणा सारखीच छोटी इलेक्ट्रॉनिक मशीन तयार करण्यात आली आहे. हे मतदान 'पेपर लेस' असून २५जानेवारीला शहराचा प्रमुख पक्षीची निवड

➤ पान ५ वर

**पक्षी निवडणुकीची प्रक्रीया २४ जानेवारीपर्यंत**

सदर निवडणूक प्रक्रिया १५ ते २४ जानेवारीपर्यंत विविध शाळा महाविद्यालयात राबविली जात आहे. यापूर्वी वर्धा, जळगाव, पुणे, अहमदनगर या शहरात पक्षी निवड झाली. पक्षी संवर्धन पर्यावरणाचा समतोल आणि पक्षांप्रती आवड निर्माण व्हावी हा पक्षी निवडणूक संकल्पनेचा उद्देश आहे. अशी माहीती पक्षीमित्र दीपक जोशी यांनी सांगीतली. अमोल सावंत यांच्या मते मतदान व निसर्ग संस्कार होण्यासाठी या निवडणुकीचे आयोजन करण्यात आले आहे.

**विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष मतदानातून... (जिल्हा RDX3 वरून)**

होणार आहे. सदर निवडणूक प्रक्रीया यशस्वी करण्यासाठी निवडणूक अधिकारी वैशाली देवकर, प्रकाश अंधारे, पक्षी मित्र दिपक जोशी, उदय वझे, देवेंद्र तेलकर, प्रा.राजा सर, प्रा. डॉ. मिलींद शिरभाते, अमोल सावंत, अजिम शेख, शिवा इंगळे, गौरव झटाले, दिप्ती धोटे, माधुरी अंभोरे, कल्याणी देशमुख, प्रतिक्षा, अश्विनी धर्मे, ज्ञानेश्वरी सातारकर, राज निशाने व अभय साखरकर हे विद्यार्थी परीश्रम करीत आहे.

**रालतो महाविद्यालयात विक्रमी मतदान**

आरएलटी विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विजय नानोटी यांच्या मार्गदर्शनात शनिवारी मतदान झाले. या निवडणूकीतील पक्षी उमेदवार राखी धनेष, सुभग, गाय बगळा, काळा परारी व हप्पू हे होते. यामध्ये ७७६ मतदात्यांनी आपली विक्रमी नोंद केली. त्यापैकी ४७ शिक्षक, शैक्षणिक व शिक्षकेतर कर्मचा-यांनी मत दिले आणि ७२९ विद्यार्थ्यांनी मतदान केले. ७२९ विद्यार्थ्यांपैकी ६०३ मुली व १२६ मुलांनी आपले पक्षी निवडण्या करीता मतदान केले.